(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

**<u>वनजमिन-अहमदनगर</u>**

**वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मुख्य व्यवस्थापक, सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन हेड, भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स (पूर्व), मुंबई यांना तालुका-पारनेर, जि.अहमदनगर मधील राज्य महामार्ग क्र.२७, केडगांव ते सुपे च्या कडेने भूमिगत नैसर्गिक गॅसची पाईपलाईन टाकण्याकरिता ०.१० हेक्टर राखीव व अवर्गीकृत वनजमिन वळती करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१८२०/प्र.क्र.१८२/फ-१०**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: २५/०३/२०२१

**<u>प्रस्तावना :-</u>**

मुख्य व्यवस्थापक, सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन हेड, भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स (पूर्व), मुंबई यांनी तालुका-पारनेर, जि.अहमदनगर मधील राज्य महामार्ग क्र.२७, केडगांव ते सुपे च्या कडेने भूमिगत नैसर्गिक गॅसची पाईपलाईन टाकण्याकरिता ०.१० हेक्टर राखीव व अवर्गीकृत वनजमिन वळती करणेचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या सविस्तर छाननीअंती त्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन आदेश:-</u>**

भारत सरकारच्या पत्र क्र.५-२/२०१७-एफसी, दिनांक २८/०३/२०१९, Handbook of FCA Guidelines-2019, Chapter 4 (General Approval under Section 2 (ii) of FCA) अन्वये राज्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, तालुका-पारनेर, जि.अहमदनगर मधील राज्य महामार्ग क्र.२७, केडगांव ते सुपे च्या कडेने भूमिगत नैसर्गिक गॅसची पाईपलाईन टाकण्याकरिता ०.१० हेक्टर राखीव व अवर्गीकृत वनजमिन वळती करण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२७९१/(१५)/५६८/२०२०-२१, दिनांक ०१/१०/२०२० अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास तत्त्वत: मंजूरी देत आहे. वनजमिनीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| अनु. क्र. | गावाचे नाव | तालुका व जिल्हा | आवश्यक वनक्षेत्राचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व्हे/ गट नंबर | लांबी x रुंदी (मीटर मध्ये) | क्षेत्रफळ (स्क्वेअर मीटर मध्ये) | क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये) | वैधानिक दर्जा |
| १. | सुपे | ता.पारनेर, जि.अहमदनगर | ५०३ | २५० x २.०० | ५०० | ०.०५० | राखीव वने |
| २. | वाघुंडे खुर्द | | ८ | २५० x २.०० | ५०० | ०.०५० | अवर्गीकृत वने |
| एकूण वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | | | | | | ०.१० | |

२. सदर तत्वत: मंजूरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

३) भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प यंत्रणेस ०.१० हेक्टर वनक्षेत्राकरीता अनुज्ञेय नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरणे बंधनकारक राहील.

४) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार/ सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरावी लागेल.

५) रस्त्याच्या कडेने नैसर्गिक गॅस पाईपलाईन टाकण्याकरीता संबंधित सक्षम प्राधिकरणाची पूर्व परवानगी प्राप्त करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

६) आवश्यक असल्यास सक्षम प्राधिकरणाव्दारे पर्यावरणीय मंजूरी प्राप्त करुन घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

७) प्रस्तावित वनक्षेत्रातून नैसर्गिक वायूची पाईपलाईन पुरेश्या सुरक्षिततेच्या उपायांसह प्रमाणित मानकांनुसार भूपृष्ठापासून खोलवर टाकली जाईल.

८) प्रस्तावित प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असणा-या साधनसामुग्रीची ने-आण करणेसाठी वनक्षेत्रात कोणताही अतिरिक्त/ नवीन रस्ता तयार करण्यात येऊ नये.

९) प्रकल्पाचे काम करतेवेळी मजूर व इतर कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्रातील वनस्पती व प्राणी यांना हानी पोहचणार याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

१०) प्रकल्पास अंतिम मान्यता मिळण्यापूर्वी प्रकल्प यंत्रणेने अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत विहित नमुन्यातील आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता करावी.

११) प्रकल्पाकरीता वनजमिन वापरल्यानंतर प्रकल्प यंत्रणा वनजमिन पूर्ववत करेल.

१२) वळतेकरणाकरीता प्रस्तावित क्षेत्रात प्रकल्प यंत्रणेस वृक्षतोड करता येणार नाही.

१३) प्रकल्पाच्या भविष्यातील देखभालीच्या कामाकरीता आवश्यकतेनुसार संबंधित उपवनसंरक्षक यांची परवानगी घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

१४) प्रकल्प यंत्रणेस नैसर्गिक वायूची पाईपलाईन टाकताना अस्तित्वातील रस्त्यालगतचे मंजूरी नसलेले इतर वनक्षेत्र वापरता येणार नाही.

१५) प्रकल्प यंत्रणेव्दारे प्रचलित दरपद्धतीनुसार भरण्यात आलेल्या रकमेचा तपशील तसेच दरम्यानच्या कालावधीत नवीन नियमांनुसार भरण्यात आलेल्या इतर रकमांचा तपशील मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक सादर करतील.

१६) प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडून भरण्यात येणारी सर्व रक्कम ॲडव्हॉक-कॅम्पाच्या खात्यात जमा करण्यात यावी व त्याचा तपशील सादर करण्यात यावा.

१७) प्रस्तुत तत्वत: मान्यता आदेशातील अटींचा पूर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर संरक्षित क्षेत्राच्या मर्यादेबाहेर नैसर्गिक वायूची पाईपलाईन टाकण्यास प्रकल्प यंत्रणेस मूभा राहिल. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना आणि या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

१८) प्रकल्प यंत्रणेने उक्त प्रकल्पास लागू असण्या-या सर्व संबंधित कायद्यांतील तरतुदी, नियम व मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

१९) वन विभागाने घातलेल्या सर्व अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

२०) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी.

२१) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त प्रयोजनासाठी वनजमिन वळतीकरणास अंतिम मंजूरी प्रदान करील आणि मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक हे वरील पूर्तता झाल्यानंतर प्रत्यक्षात वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३२५१४५८२८१४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arvind Shankar Apte

Digitally signed by Arvind Shankar Apte
DN: CN = Arvind Shankar Apte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2021.03.25 15:05:49 +05'30'

**( अरविंद आपटे )**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत:-**

१. सचिव, पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

२. क्षेत्रिय अधिकारी (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

७. विभागीय आयुक्त, नाशिक.

८. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.

९. मुख्य वनसंरक्षक (प्रा), नाशिक.

१०.जिल्हाधिकारी, अहमदनगर.

११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर.

१२.उपवनसंरक्षक, अहमदनगर.

१३.मुख्य व्यवस्थापक, सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन हेड, भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स (पूर्व), मुंबई.

१४. निवडनस्ती फ-१० कार्यासन.

**<u>Forest Land-Ahmednagar</u>**

**Diversion of 0.10 Ha. Reserved and Unclass Forest land under Forest (Conservation) Act, 1980 in favour of Chief Manager, City Gas Distribution Head, Bharat Gas Resources Ltd., Bandra-Kurla Complex (East), Mumbai for laying of underground Natural Gas Pipeline in right of way (ROW) of SH-27 from route Kedgaon to Supe in Taluka- Parner in Ahmednagar district.**

# Government of Maharashtra

## Revenue and Forest Department

## Government Order No.: FLD-1820/CR-182/F-10

Mantralaya, Mumbai-400 032

Date: 25/03/2021

**<u>Preamble:-</u>**

Chief Manager, City Gas Distribution Head, Bharat Gas Resources Ltd., Bandra-Kurla Complex (East), Mumbai has submitted a proposal for diversion of 0.10 Ha. Reserved and Unclass Forest land under Forest (Conservation) Act, 1980 for laying of underground Natural Gas Pipeline in right of way (ROW) of SH-27 from route Kedgaon to Supe in Taluka- Parner in Ahmednagar district to the State Forest Department. After careful consideration and scrutiny of the proposal, granting of in-principle approval to the aforesaid project is under consideration of the State Government.

**<u>Order:-</u>**

In exercise of powers delegated to the State Governments, vide Government of India's letter no. 5-2/2017-FC, dated 28/03/2019, Handbook of FCA Guidelnes-2019, Chapter 4 (General Approval under Section 2 (ii) of FCA), Government of Maharashtra is pleased to grant 'in-principle' approval to the diversion of forest land under section-2 of the Forest (Conservation) Act, 1980, for diversion of 0.10 Ha. Reserved and Unclass Forest land as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter no. Desk-17/NC/II/ID-12791/(15)/568/2020-21, dated 01/10/2020 for laying of underground Natural Gas Pipeline in right of way (ROW) of SH-27 from route Kedgaon to Supe in Taluka- Parner in Ahmednagar district. The details are as given below:-

| Sr.No. | Village Name | Taluka & District | Forest Land Details | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Survey/ Gut No. | Length x Width (in Meter) | Area (in Sqare Meter) | Area (in Hectare) | Legal Status |
| 1. | Supe | Tal.Parner, Dist-Ahmednagar | 503 | 250 x 2.00 | 500 | 0.050 | Reserved Forest |
| 2. | Waghunde Khud | | 8 | 250 x 2.00 | 500 | 0.050 | Unclass Forest |
| **Total Forest Area (in Hectare)** | | | | | | **0.10** | |

2. This in-principle approval is issued subject to the following conditions:-

1) The legal status of the land will remain unchanged.
2) The Forest land shall not be used for any purpose other than specified in the project.
3) The User Agency will defray the cost of Net Present Value of 0.10 Ha. of Forest Land as per latest guidelines of Government of India.
4) The User Agency will defray the additional/ revised cost of Net Present Value as per latest guidelines of Government of India.
5) The User Agency shall obtain the permission of concerned competent authority for laying of Natural Gas Pipeline within the ROW.
6) The User Agency will obtain the Environmental Clearance from competent authority, if required.
7) The Natural Gas Pipeline will be laid well below as per the norms the ground level all along its length through forest and adequate safety measures to be adopted.
8) No additional or new path will be constructed inside the forest area for transportation of construction materials for the execution of the project work.
9) It will be the responsibility of the User Agency to ensure that the labourers, staffs engaged in construction activity do not damages nearby forest flora and fauna.
10) The User Agency will fulfill the complete compliance of the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forests Rights) Act, 2006 before final approval.
11) The User Agency will make good the forest land after laying underground natural gas pipeline.
12) No trees shall be felled in the area proposed for diversion.
13) For further maintenance of the project, the agency shall obtain permission from the concerned Deputy Conservator of Forests as and when required.
14) No new forest area beyond the Right of Way of existing road should be broken for laying Optical Fiber Cable.
15) The Chief Conservator of Forest (T), Nashik shall report the details of amount recovered from the Project Authority at prevalent rate and all other cost required as per the rules in due course of time.
16) All the amount received from the User Agency under the project shall be transferred to the account of Ad-hoc CAMPA and compliance will be reported to this office.
17) The User Agency will be authorized to lay the Natural Gas Pipeline outside the confines of the protected area after compliance of this order. Any breach of the conditions by the User Agency will be treated as violation of the provision of the Forest (Conservation) Act, 1980.
18) Provision of all relevant Acts, Rules made there under and guidelines applicable to the project shall have to be strictly followed.
19) All the conditions stipulated by the Forest Department shall be binding on User Agency.

20) Any other condition which Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur may impose.

21) The Final approval shall be granted by the State Government after fulfillment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the Chief Conservator of Forests (T), Nashik.

3. This Government Order of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202103251458281419. This Order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Arvind Shankar Apte

Digitally signed by Arvind Shankar Apte
DN: CN = Arvind Shankar Apte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2021.03.25 15:06:04 +05'30'

**( Arvind Apte)**
**Chief Conservator of Forests (Mantralaya)**

**Copy to:-**

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Regional Officer (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Integrated Regional Office, Nagpur.
3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur.
4. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
5. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
7. Divisional Commissioner, Nashik.
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
9. Chief Conservator of Forests (T), Nashik.
10. Collector, Ahmednagar.
11. Chief Executive Officer, Zilha Parishad, Ahmednagar.
12. Deputy Conservator of Forests, Ahmednagar.
13. Chief Manager, City Gas Distribution Head, Bharat Gas Resources Ltd., G-Block, Bandra-Kurla Complex (East), Mumbai.
14. Select File-F-10.